महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल :-mahapocra@gmail.com

जा क्र. नादेकृसंप्र- ०१२५/प्र.क्र.०१/कृ.अ./282/2025 दि. 17/०३/२०२५

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
(प्रकल्पातील सर्व जिल्हे)

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सूक्ष्म नियोजन प्रक्रियेपूर्वी मृद व जलसंधारण कामांच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करणेबाबत....**

**संदर्भ** :- १) प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. १९२, दि. २५.०२.२०२५ रोजीचे पत्र.
२) प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. २०७, दि. १७.०५.२०२२ रोजीचे पत्र.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील २१ जिल्ह्यांमधील ७२०१ गावे निवडण्यात आली आहेत. प्रकल्पातील निवडलेल्या गावांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी आणि कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी मृद व जलसंधारणाशी संबंधित विविध कामे राबविण्याचे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सूक्ष्मनियोजन प्रक्रिया सुरू होत आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये सुक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान पाण्याचा ताळेबंदावर आधारित मृद जलसंधारण कामांचा आराखडा तयार केला जाणार आहे. सदर आराखड्यामध्ये कृषि विभागाच्या प्रचलित कार्यपद्धतीनुसार राबविण्यात येणारी मृद व जलसंधारण कामे समाविष्ट असणार आहेत. सदरील आराखड्यामध्ये प्रस्तावित कामे तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असणे आवश्यक आहे, जेणेकरून आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत होईल.

उक्त बाबी लक्षात घेता प्रकल्पांतर्गत कार्यरत सर्व कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी आणि उपविभागीय कृषि अधिकारी यांचे जिल्हास्तरावर मृद व जलसंधारण कामांच्या अनुषंगाने एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. सदर प्रशिक्षणास मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रित करण्यात यावे. प्रशिक्षणामध्ये पाणलोट आधारित मृद व जलसंधारणा संबंधित राबवविले जाणारे विविध उपचार, त्यांचे तांत्रिक व आर्थिक मापदंड तसेच सूक्ष्म नियोजन प्रक्रियेदरम्यान कामे प्रस्तावित करणे व जागेची निवड (स्थळ निश्चिती) याबाबींवर विशेष भर देण्यात यावा. या प्रशिक्षणाचे आयोजन सूक्ष्म नियोजन प्रक्रियेपूर्वी करण्यात यावे. सदरील एक दिवसीय अनिवासी प्रशिक्षणासाठी येणारा खर्च प्रस्तुत कार्यालयाचे पत्र जा.क्र. नादेकृसंप्र-१२१९/कृषिविद्या/प्रशिक्षण/प्रक्र.२०६/२०२२-२३/२०७, दिनांक १७/०५/२०२२ मध्ये नमूद मापदंड (रु. २५०/- प्रती व्यक्ती) यामर्यादेत करण्यात यावा. सदर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर निधी मागणी प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करण्यात यावी.

Parimal 17/3

**(परिमल सिंह)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

प्रत:-

१. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांना माहितीस्तव
२. विभागीय कृषि सहसंचालक (नाशिक, छ.संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.